|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

**बातमी-२**

जळगाव (दि.27)- राष्ट्रीय सुरक्षेसाठी सर्वांनी एकत्र येवून कार्य करण्याची गरज आहे. अंतर्गत व बाह्य सुरक्षेसंदर्भात नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात अनास्था दिसून येते. राष्ट्रीय एकात्मतेचा अभाव आपल्यात मोठ्या प्रमाणात दिसून येतो. हेच राष्ट्रीय सुरक्षतेसमोरील मोठे आव्हान असून सक्षम आणि बलशाही देश निर्मितीसाठी सर्वांनी एकत्र येवून सामुहिक शक्तीचे दर्शन शत्रू राष्ट्रांना करून देण्याची गरज असल्याचे मत सेवानिवृत्त मेजर जनरल डॉ.जी.डी. बक्षी यांनी व्यक्त केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाच्यावतीने दि.27 फेब्रुवारी 2018 पासुन भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेपुढील नवीन आव्हाने या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार (दि. 27 रोजी) या द्विदिवसीय चर्चासत्राचे उद्घाटन मेजर जनरल डॉ.जी.डी.बक्षी यांचेहस्ते विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात करण्यात आले. यावेळी विचारमंचावर उद्घाटन सत्राचे अध्यक्ष जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर, विशेष अतिथी पोलिस अधिक्षक दत्तात्रय कराळे, सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या संचालिका डॉ.अर्चना देगांवकर, कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक डॉ.तुकाराम दौड आणि चर्चासत्राचे समन्वयक प्रा.तुषार रायसिंग उपस्थित होते.

उद्घाटन सत्रात पोलिस अधिक्षक दत्तात्रय कराळे यांनी देशातील अंतर्गत सुरक्षा संदर्भात मार्गदर्शन केले. नागरिकांच्या सहकार्याशिवाय अंतर्गत सुरक्षा बळकट करता येत नाही. त्याचा परिणाम बाह्य सुरक्षा यंत्रणेवर देखील दिसून येतो. त्यामुळे देशातील नागरिकांनी अंतर्गत व बाह्य सुरक्षेसाठी आपसातील वाद-विवाद बाजुला सारून देश सुरक्षेचा विचार प्राधान्याने करावा असे मत श्री.दत्तात्रय कराळे यांनी यावेळी व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर यांनी देशापुढे दहशतवाद, हिंसाचार, आपसी वाद-विवाद यामुळे अंतर्गत सुरक्षेचे प्रश्न निर्माण झाले आहे. ते दूर करण्यासाठी सर्वांनी एकत्र येवून राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचे मत यावेळी व्यक्त केले. उद्घाटन सत्राचे स्वागतपर भाषण डॉ.तुकाराम दौड यांनी केले. सुत्रसंचालन व आभार डॉ.उस्मानी यांनी मानले.

उद्घाटन सत्रानंतर मेजर जनरल डॉ.बक्षी यांनी राष्ट्रीय सुरक्षेचा भारतीय दृष्टीकोन या विषयावर बीजभाषण केले. जगात सुरक्षेसंदर्भातील समीकरण झपाट्याने बदलत असून सर्वांनाच अंतर्गत व बाह्य असुरक्षीतता जाणवत आहे. भारतात सुमारे 2000 वर्षापूर्वी मौर्य कालखंडात अंतर्गत व बाह्य सुरक्षेच्या प्रश्नाविषयी आचार्य चाणक्य यांनी ठोस नितीचा अवलंब केला होता. हीच चाणक्यनिती आज अवलंबविणे गरजेचे आहे. भारताला सुरक्षेसंदर्भात मोठ्या प्रमाणात उपाययोजना करणे गरजेचे आहे. सुरक्षा यंत्रणेसाठी इतर देश मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक करीत आहे. मात्र भारतात आर्थिक गुंतवणूक इतरांच्या तुलनेत कमी असून ती वाढविणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. भारतापुढे सुरक्षा यंत्रणेचे सक्षमीकरण, राष्ट्रीय एकात्मतेचा विकास आणि ऊर्जा, तेल व पाणी या संदर्भातील स्वावलंबीता हे मोठे आव्हान असल्याचे मत त्यांनी बीजभाषणात व्यक्त केले.

चर्चासत्रात दुपारी दोन सत्र घेण्यात आले. यात मुंबई विद्यापीठाचे डॉ.नियाकत खान यांनी भारतातील मिलटरी सुरक्षेपुढील आव्हाने आणि संधी या विषयावर तर पुणे विद्यापीठाचे प्रा.श्रीकांत परांजपे यांनी काश्मीर प्रश्न आणि शासनाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. उद्या दि.28 फेब्रुवारी 2018 रोजी दुपारी या द्विदिवसीय चर्चासत्राचा समारोप होणार आहे.

------

बातमी-3

जळगाव 27( )उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला उद्या बुधवार दिनांक 28 फेब्रुवारी, 2018 रोजी सुटी जाहीर करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या 26 व्या पदवीप्रदान समारंभाच्या पूर्वतयारीसाठी रविवार 25 फेब्रुवारी रोजी विद्यापीठ सुरू ठेवण्यात आले होते. त्यामुळे बुधवारी विद्यापीठाला सुटी जाहीर करण्यात आली आहे.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. २७ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

जनसंपर्क अधिकारी

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

A' Grade
'(NAAC Re-Accredited )
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

जळगाव दि.27 ( ) तंत्रज्ञानामुळे जगात प्रचंड वेगाने बदल घडत असून त्यामुळे रोजगाराच्या मोठया संधी प्राप्त होणार आहे. या संधीचा तरुणांनी फायदा घ्यावा आणि जागतिक नागरिक बनण्याचा प्रयत्न करा असे आवाहन अमेरिकेतील प्रख्यात नवोपक्रमशील आणि उच्च तंत्रज्ञानाभिमुख उद्योजक डॉ.अशोक जोशी यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा 26 वा पदवीप्रदान समारंभ मंगळवार,दि. 27 फेब्रुवारी रोजी मोठया उत्साहात पार पडला. यावेळी स्नातकांना उद्देशून दीक्षांत भाषण करताना डॉ.अशोक जोशी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील होते.

डॉ.जोशी यांनी यावेळी त्यांच्या उद्योजकीय प्रवासाचे कथन करताना आलेले अनुभव आणि त्या अनुषंगाने उद्योजकीय नेतृत्व करण्यासाठी आवश्यक असलेल्या नेतृत्व गुणांबाबत स्नातकांशी सविस्तर संवाद साधला. जवळपास दीड तास झालेल्या डॉ.जोशी यांच्या भाषणाने सर्व स्नातक भारावून गेले. पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे त्यांनी सादरीकरण केले. अमेरिकेतील केरामाटक या टेक्नॉलॉजी कंपनीचे अध्यक्ष असलेले डॉ.जोशी यांनी त्यांना सहा टेक्नॉलॉजी कंपन्यांची स्थापना करताना आलेल्या अडचणी त्यातून काढलेला मार्ग यावर भाष्य केले. ते म्हणाले की, जगात गरीबी कमी होत आहे, माणसाचे आयुर्मान वाढले आहे, जीडीपी वाढला आहे, नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे. वीज सर्वत्र उपलब्ध होत आहे. सौरऊर्जेची किंमत कमी होत आहे. शेतीतील तंत्रज्ञान वाढले आहे. हे सगळे बदल केवळ तंत्रज्ञानामुळेच होत असून पुढील दहा वर्षात आपला मोबाईल दहा लाख पटीने शक्तीमान होईल. चालकाविना गाडी चालेले. गतीमान संगणक येत आहेत. रोबोटने माणसाची जागा घेतली आहे. तंत्रज्ञानाच्या या घोंघावणाऱ्या वादळात रोजगाराची खूप मोठी संधी आहे. आठ कंपन्या स्थापन करणाऱ्या डॉ.जोशी यांनी आपले अनुभव कथन करताना सांगितले की, अमेरिकेतून काही वर्षापूर्वी भारतात आल्यावर व्यवसाय सुरु केला. मात्र त्यात यश आले नाही. कर्ज झाले, हे कर्ज व्याजासह फेडले. पुन्हा अमेरिकेत जावून सेरामेटीक कंपनीत वैज्ञानिक म्हणून रुजू झालो. भारतातील अनुभवाने या कंपनीत खूप काही चांगले नवे करता आले. हीच कंपनी पुढे विकत घेतली. यशाची किल्ली सांगताना ते म्हणाले की, सोबत काम करणाऱ्या सहकाऱ्यांना नेहमीच प्रोत्साहन द्यायला हवे. निर्णय क्षमता हवी. भाविनक होऊन निर्णय न घेता तटस्थपणे निर्णय घ्यायला शिका. आपण कोणालाही सतत आनंदी ठेवू शकत नाही. यश हे आपल्यापूरतेच मर्यादित असते. हे लक्षात घ्या. श्रध्दा, कुटुंब, समाज आणि काम या चार गोष्टींवर सातत्याने भर द्या. जात आणि धर्म या पलिकडे जावून जागतिक नागरिक व्हा.असे सांगताना डॉ.जोशी यांनी आपल्या वाटेत अनेक अपमान येतील ते झेलण्याची मनाची तयारी ठेवा. अहंकाराचा स्पर्श होऊ देवू नका. विचारांनी समृध्द व्हा. वेळेचा अपव्यय करु नका. जगातिक स्पर्धेचा ध्यास असायला हवा त्यातून संधी मिळतील. इतिहासावर फार अवलंबून राहू नका अशा काही टिप्स् स्नातकांना दिल्या.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी विद्यापीठाच्या वाटचालीचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांसाठी गेल्या वर्षभरात राबविण्यात आलेल्या योजनांची माहिती त्यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमात दीक्षांत मिरवणूकीने सभामंडपात अतिथींचे आगमन झाले. विद्यापीठाचा मानदंड घेऊन मिरवणूकीच्या अग्रभागी सहायक कुलसचिव शरद जोशी होते. दीक्षांत मिरवणूकीत प्रमुख अतिथींसह अधिसभा सदस्य, विद्या परिषद सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य हे सहभागी होते. प्रारंभी विद्यापीठ गीताने सुरूवात झाली. प्रा.संजय पत्की व सहकाऱ्यांनी गीत सादर केले. त्यानंतर कुलसचिव भ.भा.पाटील यांनी कुलगुरुंकडे कार्यक्रम सुरू करण्याची परवानगी मागितली. विविध विद्याशाखांच्या प्रभारी अधिष्ठातांनी स्नातकांना पदवी प्रदान करण्यास्तव केलेल्या विनंतीनुसार स्नातकांना पदवी प्रदान केल्या.

..2..

अधिष्ठातांमध्ये, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य डी.आर.पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य पी.पी.छाजेड, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य बी.एन.पाटील आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य श्रीमती एल.एस.मोरे यांचा समावेश होता.

यावेळी गुणवत्ता यादीतील 84 विद्यार्थ्यांना अतिथींच्या हस्ते सुवर्णपदके देण्यात आली. सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.ए.बी.चौधरी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आशुतोष पाटील व प्रा.सुरेखा पालवे यांनी केले.

यावेळी मंचावर प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्रा.एस.टी.इंगळे, प्राचार्य डी.एस.सुर्यवंशी, प्राचार्य एल.पी.देशमुख, प्रा.नितीन बारी, प्रा.मोहन पावरा, डॉ.सुभाष चौधरी, श्री.विवेक लोहार, श्री.दीपक पाटील, डॉ.प्रशांत कोडगिरे, कुलसचिव भ.भा.पाटील, डॉ.केशव तुपे , डॉ.बी.डी.कऱ्हाड उपस्थित होते. या समारंभासाठी सुरेखा अशोक जोशी, संतोष मेकल, सरोज मेकल, गोपी मयुर, संध्या मयुर तसेच जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर, जिल्हा पोलीस अधिक्षक दत्तात्रय कराळ आदी उपस्थित होते.

या पदवीप्रदान समारंभात ३५ हजार १६४ स्नातकांना पदव्या बहाल करण्यात आल्या. यामध्ये, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे ११ हजार ९२५ स्नातक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे ३ हजार ३२५ स्नातक, मानव्य विद्याशाखेचे ५ हजार २४२ आणि आंतर विद्याशाखेचे ६६३ स्नातकांचा समावेश आहे. गुणवत्ता यादीतील ८४ विद्यार्थ्यांना या समारंभात सुवर्णपदक देण्यात आले. या समारंभात प्रत्यक्ष पदवी घेण्यासाठी २१ हजार १५५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यामध्ये २२२ पीएच.डी.धारक विद्यार्थी आहेत.

---

जा.क्रं. : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक:- 27 फेब्रुवारी, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी